अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# श्वेतपत्रिका आरोपपत्र ठरण्याची भीती वाटली

जलसिंचनाच्या मुद्दावरून राज्यामध्ये राजकीय वातावरण तापले आहे. पस्तिस हजार कोटींच्या या जलसिंचन घोटाळ्याविषयी सरकार श्वेतपत्रिका काढेल असे मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी जाहीर केले.परंतु आता आपल्या शब्दापासून त्यांनी घेतलेली माघार म्हणजे जलसिंचन घोटाळ्याला बगल देण्याचा राजकीय डावपेच आहे. यात काही शंका नाही. अर्थात राजकारणी लोक आपला शब्द फिरवण्यातच प्रसिध्द असतात. दिलेला शब्द पाळणे किंवा त्याची तशीच्या तशी अंमलबजावणी करणे ही गोष्ट राजकारणात बसतच नाही. जलसिंचनाचेच नाही तर गिरणी कामगारांबाबतही मुख्यमंत्र्यांनी असेच शब्द फिरवण्याचे काम केले. सगळ्या गिरणी कामगारांना घरे दिली जातील असे आश्वासन देणारे मुख्यमंत्री आता काही हजारच घरे देण्याची भाषा बोलत आहे. राजकारणातले हे शब्द फिरवण्याचे तंत्र जनतेचा विश्वासघात करीत असते. आता श्वेतपत्रिकेऐवजी स्थितीदर्शक अहवाल म्हणजे स्टेटस रिपोर्ट तयार करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. खरे तर सरकारने केलेल्या भ्रष्टाचाराची काळी कहाणी उघड करण्याकरिता सरकारनेच श्वेतपत्रिका काढावी हा प्रकारच हास्यास्पद ठरतो. अगदी पुराव्यासकट म हाराष्ट्रातल्या अनेक जलसिंचन प्रकल्पांचा खर्च दहा दहा पटीने वाढवला गेल्याचे सिध्द झाले आहे.अशा परिस्थितीत सरकारने वस्तुस्थिती सांगण्याचा प्रयत्न करणे म्हणजेच श्वेतपत्रिका काढून काळे व्यवहार दडपण्याचा केविलवाणा प्रयत्न केल्यासारखे ठरते.या श्वेतपत्रिकेऐवजी राजकारणाबाहेरच्या तज्ञ लोकांची समिती नेमून वस्तुस्थिती काय आहे याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न जास्त योग्य ठरतो. त्यातूनच खरे काय आहे याचा अंदाज येऊ शकेल. ज्या कारणांसाठी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना राजीनामा द्यावा लागला. आपल्यावरचे आरोप अयोग्य असल्याचा दावा ते वारंवार करत आहेत. अशा परिस्थितीत श्वेतपत्रिका काय किंवा स्टेटस रिपोर्ट काय या दोन्ही गोष्टींच्या नावाने सारवासारव केली जात आहे. खरे तर सरकारमध्येच कार्यरत असलेल्या मुख्य अभियंता विजय पांढरे यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेली सगळी पत्रे हीच एक श्वेतपत्रिका मानली पाहिजे. जलसिंचनातल्या काळ्या व्यवहारांवर याच पांढऱ्यांनी पांढरे पट्टे ओढून सरकारला उघडे पाडले आहे. आम्ही तर असे म्हणतो की पांढरे यांची पत्रे हीच श्वेतपत्रिका समजली जावी. किंवा त्यांचा समावेश असलेलीच एक स्वतंत्र समिती नेमली तरी चालू शकेल. परंतु हा केवळ जलसिंचन घोटाळा नाही. तर त्यात राजकीय घोटाळासुध्दा असल्यामुळे त्या प्रकल्पांऐवजी आपला सत्ताप्रकल्प टिकवणे मुख्यमंत्र्यांच्या दृष्टीने जास्त महत्त्वाचे आहे.

## पांढरे यांची पत्रे हीच श्वेतपत्रिका

आजच्या घडीला राष्ट्रवादी काँग्रेसला दुखवणे मुख्यमंत्र्यांना परवडणारे नाही. श्वेतपत्रिका न काढता स्टेटस रिपोर्ट तयार करण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा म्हणजे एक राजकीय मांडवली करण्यासारखे आहे.जर का श्वेतपत्रिका काढली तर अजित पवारांबरोबर राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर सगळे सरकारच आरोपीच्या पिंजऱ्यात उभे राहू शकते. ती श्वेतपत्रिका न राहता सरकारविरुध्द केलेले एक आरोपपत्र होऊ शकते, अशी भीती वाटल्यामुळे मुख्यमंत्र्यांनी ही मधली पळवाट शोधलेली आहे. राजकारणामध्ये एक गोष्ट बरी असते ती म्हणजे वेगवेगळे शब्द वापरून लोकांची दिशाभूल करायची आणि खरी परिस्थिती समोर येऊ द्यायची नाही. चौकशी समिती, चौकशी आयोग, स्टेटस रिपोर्ट, श्वेतपत्रिका या सगळ्या गोष्टी वेळ मारून नेण्यासाठी असतात. याबाबत कितीही अहवाल दिले गेले तरी कोणतीही प्रत्यक्ष कारवाई होत नाही. आतापर्यंत अनेक गैरव्यवहारांविषयी अशा श्वेतपत्रिका आणि स्टेटस रिपोर्ट तयार झाले आणि ते रिपोर्ट आपल्या स्टेटसप्रमाणे मंत्रालयात धूळखात पडले. आदर्श इमारतीच्या घोटाळ्याबाबतही अशा प्रकारचा स्टेटस रिपोर्ट मांडण्याचा प्रयत्न झाला. त्यातूनही काहीच निष्पन्न झाले नाही. ज्या ज्या ठिकाणी राजकारण्यांचा सहभाग असतो त्या त्या ठिकाणी त्यांना वाचवण्याचेच प्रयत्न राजकारणी मंडळी करत असतात. खरे तर प्रथम दर्शनी घोटाळा झाल्याचे लक्षात आल्याबरोबर कठोर चौकशीचे आदेश दिले गेले पाहिजेत. वेळ पडली तर ताबडतोब गुन्हा दाखल झाला पाहिजे. सामान्य माणसाच्या बाबतीत असे ताबडतोब घडू शकते. परंतु राजकारण्यांच्याबाबतीत हे होऊच शकत नाही. त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्याकरिता सरकारच्या परवानगीची आवश्यकता असते. आज सुनिल तटकरे, छगन भुजबळ, राजेंद्र दर्डा या मंत्र्यांविरुध्द आरोप झालेले आहेत. परंतु चौकशी मात्र सुरू झालेली नाही आणि ती कधीकाळी होईल यावर सामान्य माणसाचाही विश्वास नाही. या सगळ्या राजकीय परंपरेला धरूनच पृथ्वीराज चव्हाण यांनी श्वेतपत्रिकेऐवजी स्थितीदर्शक अहवालाचे कागदी घोडे नाचवले आहेत. स्वाभाविकपणे अनेक वर्षांचे राजकीय संबंध आणि सत्तेची खुर्ची या दोन्ही गोष्टींचा विचार केल्यानंतर जलसिंचन घोटाळ्याबाबत सरकार फार मोठे टोकाचे पाऊल उचलेल अशी शक्यताच नाही. एवढा मोठा आदर्श इमारतीचा घोटाळा होऊनही एकाही राजकारण्याला अद्याप अटक झालेली नाही. आणि होणारही नाही. आपल्या लोकशाही व्यवस्थेचा हा सर्वात मोठा दोष असल्यामुळे देशाचे वाटोळे होत आहे. राजकारण्यांनी धुडगूस घालावा सामान्यांनी मर मर मरावे आणि श्रीमंतांनी तिजोऱ्या फुगवाव्यात अशी ही सुलतानशाही लोकशाहीच्या नावाखाली धिंगाणा घालत आहे.

## सत्य दडपण्यासाठीच सत्ता असते

सत्ता हे एक असे प्रकरण आहे की त्यात सत्य दडवणे यासाठीच आपले कसब पणाला लावले जाते. कोणाचा जर असा समज असेल तर ही सत्ता ही सामान्यांना सत्य सांगण्यासाठी असते. तर तो हा मोठा गैरसमज आहे सत्ता राबवण्याचे काम राजकारणी करतात. ज्या ठिकाणी सत्य दडपण्याची कलाच अवगत करावी लागते. राजकारणी कधीही सत्य परिस्थितीला सामोरे जावू शकत नाहीत. त्यांच्यात तेवढी धमक नसते. कदाचित म्हणूनच सत्यमेव जयते हे आपल्या देशाचे घोषवाक्य केवळ एक चिन्ह म्हणूनच वापरले जात असावे. उलट सत्याचा वारंवार पराजय करून सत्ता टिकवण्याचे काम होते. एवढा मोठा सिंचन घोटाळा झाला पण एकाही राजकारण्याने तो उघड केला नाही. विरोधी पक्षनेत्यानां त्याचा थांगपत्ता लागला नाही, असे म्हणण्यापेक्षा त्यांनी देखील त्याकडे दुर्लक्ष केले असे म्हणावे लागेल. शेवटी एका सरकारी अधिकाऱ्याला पुढाकार घ्यावा लागला आणि जलसिंचन प्रकल्पांमध्ये राजकारणी कसे पैशाची 'मासेमारी' करत आहेत हे दाखवून द्यावे लागले. विजय पांढरे यांच्या या धाडसीपणानंतर विरोधी पक्षांनाही श्वेतपत्रिकेची आठवण झाली. खरे तर हे सत्य शोधून काढण्याचे काम विरोधी पक्षांचे आहे. आज सरकारने विरोधी पक्षांच्याही तोंडाला पाने पुसली. त्यांची श्वेतपत्रिकेची मागणी धुडकावून लावली आहे.